पुढारी, दि. 01.01.2018

श्रुती जोशी यांना पीएच.डी. प्रदान

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमधील इंग्रजी विभागाच्या प्रा. श्रुती

जोशी यांना 'पाऊलो कोएलोज सिलेक्ट फिक्शन : अ स्टडी इन इन्स्पिरेशनल लिटरेचर' या विषयावर आपला पीएच.डी. चा प्रबंध शिवाजी विद्यापीठास सादर केला. या प्रबंधाबद्दल विद्यापीठाकडून इंग्रजी विषयाची पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. त्यांना प्राचार्य डॉ. अशोक करांडे, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष, प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्य शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर आदींचे मार्गदर्शन लाभले.

म. टाइम्स
दि. 31.12.2017

प्रा. श्रुती जोशी यांना पीएचडी

कोल्हापूर : येथील स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या विवेकानंद कॉलेजमधील इंग्रजी विभागाच्या प्रा. श्रुती जोशी यांना शिवाजी विद्यापीठाने नुकतीच पीएचडी पदवी प्रदान केली. त्यांनी 'पाउलो कोएलोज सिलेक्ट फिक्शन, अ स्टडी इन इन्स्पिरेशनल लिटरेचर' या विषयावर शोधनिबंध सादर केला होता. त्यांनी इंग्रजीतील प्रतिभावंत साहित्यिक 'पाउलो कोएलोज यांच्या साहित्याचा अभ्यास केला आहे. प्रा. जोशी यांना प्राचार्य अशोक कारंडे, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे, सचिव शुभांगी गावडे, प्राचार्य एस. वाय. होनगेकर, डॉ. सतीश घाटगे यांचे मार्गदर्शन लाभले. mt

त. भारत, 01.01.2018

कॅम्पस इंटरव्ह्यूमधून विवेकानंदच्या १९ विद्यार्थ्यांची निवड

कोल्हापूर : पुणे येथील आयसीआयसीआय प्रुडेशियल लाईफ इन्शुरन्स कंपनी व विवेकानंद महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कॅम्पस इंटरव्ह्यूचे आयोजन करण्यात आले. या कॅम्पस इंटरव्ह्यूमधून १९ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

महाविद्यालयाने गेल्या पाच वर्षात विप्रो, पटनी कॉम्प्युटर्स, थर्माक्स, इन्फोसिस, फेडरेल बँक, फोर्स मोटर्स अशा नामवंत कंपन्यांमध्ये ६०० विद्यार्थ्यांना नोकरीची संधी उपलब्ध करून दिली. दरवर्षी कॅम्पस इंटरव्ह्यूचे नियोजन केले जाते. या विद्यार्थ्यांना संस्थेचे कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिव प्राचार्य शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, प्लेसमेंट सेलचे समन्वयक डॉ. एम. एस. कारंजकर, डॉ. टी. सी. गौपाले, प्रा. राजश्री पाटील आदींचे मार्गदर्शन लाभले.

पुण्यनगरी
दि. 01.01.2018

एनएसएस मुक्त चितनांचे व्यासपीठ : भिकाजी लाड

धामोड / प्रतिनिधी :

एनएसएस हे युवक-युवतींना मुक्त चिंतनासाठी एक सुंदर व्यासपीठ आहे. गावाचे गावपण व घराचे घरपण टिकवून ठेवण्यासाठी प्रबोधनाची नितांत गरज आहे. ही गरज शाळा, कॉलेजमधील एनएसएस शिबिर पूर्ण करीत असल्याचे प्रतिपादन विवेकानंद कॉलेजचे प्रा. भिकाजी लाड यांनी केले. चांदे (ता. राधानगरी) येथे सह्याद्री कनिष्ठ महाविद्यालय धामोडच्या वतीने सहा दिवसांचे निवासी शिबिर होत आहे. त्यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमास प्रा. ए. एस. भागाजे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. आर. आर. माळकर यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. अध्यक्षस्थानी सरपंच बापूसो भिसे होते. या कार्यक्रमास श्रीपती आवाड, अशोकराव पाटील, सर्व संस्थांचे पदाधिकारी व शिबिर यशस्वी होण्यासाठी प्रा. डी. एस. कांबळे, प्रा. दळवी, प्रा. राठोड, प्रा. चौगले, विद्यार्थ्यांनी सहकार्य केले. सूत्रसंचालन पी. डी. मिसाळ यांनी, तर आभार कुमार सचिन कुंभार यांनी मानले.

Pn.

त. भारत
दि. 01-01-2018

प्रियांका पुरोहितचे यश

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे जयसिंगपूर येथील डॉ. जे. जे. मगदूम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये जिल्हा अंतर्गत आविष्कार संशोधन महोत्सवात विवेकानंदमधील कॉमर्स विभागाच्या प्रियांका पुरोहितने कॉमर्स विभागात प्रथम क्रमांक पटकावला. तिने 'यंतरप्रेरणरशिप अमंग मारवाडी ॲन्ड ऑदर कम्युनिटीज कोऑपरेटीव्ह स्टडिज' या विषयावर प्रकल्प सादर केला.